# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६०
तारेचा पत्ता : 'युनिपुना'

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ: शै.प्रवेश/662

दिनांक :– १४/३/२०११

मा. प्राचार्य/ संचालक
सर्व संलग्नीत महाविद्यालय/ मान्यताप्राप्त संस्था
पुणे विद्यापीठ
मा. विभागप्रमुख/संचालक
सर्व शैक्षणिक विभाग
पुणे विद्यापीठ

विद्यापीठ. अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, नक्षल विरोधी कारवाईत/ नक्षलवादी हल्यात मृत वा जखमी झालेल्या पोलिस अधिकारी/ कर्मचारी व गृहरक्षक दलाच्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना विशेष मदत व इतर सवलती देण्याबाबत शासनाच्या सोबत जोडलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करावी.(शासन निर्णय क्र. लवेसू–०७१०/नि–१०१/प्र क्र. २४/ तांशि–४ दि. २५/११/२०१०) कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव १४/३/११
शैक्षणिक प्रवेश

सोबत : वरीलप्रमाणे

नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत वा जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचारी व गृहरक्षक दलाच्या कर्मचा-यांच्या कुटुंबियांना विशेष मदत व इतर सवलती देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. लवेसू-०७१०/नि-१०१/प्र.क्र.२४/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २५ नोव्हेंबर, २०१०.

पहा : गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पीडब्ल्यूएफ-०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७, दिनांक ६ फेब्रुवारी, २००९.

**प्रस्तावना** : दिनांक १.२.२००९ रोजी गडचिरोली जिल्हयातील मरकेगांव जंगलाजवळ नक्षलवाद्यांनी पोलीस दलावर केलेल्या हल्ल्यामध्ये १५ पोलीस अधिकारी/कर्मचारी शहिद झाले. सदर घटनेच्या अनुषंगाने नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत वा जखमी झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी व गृहरक्षक दलाच्या कर्मचा-यांच्या कुटुंबियांना विशेष मदत व इतर सोयीसुविधा देण्याबाबत गृह विभागाने दिनांक ६.२.२००९ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयानुसार ज्या विशेष सोयीसुविधा मंजूर करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये मोफत शिक्षणाचा देखील अंतर्भाव आहे व या तरतूदीची अंमलबजावणी करीत असताना संबंधित विभाग विस्तृत शासन निर्णय निर्गमित करतील, तसेच त्याची अंमलबजावणी होईल याची दक्षता घेतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार मोफत शिक्षणाबाबत विस्तृत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : दिनांक १.२.२००९ रोजी गडचिरोली जिल्हयातील मरकेगांव जंगलाजवळ नक्षलवाद्यांनी पोलीस दलावर केलेल्या हल्ल्यामध्ये १५ पोलीस/कर्मचारी शहिद झाले. सदर घटनेच्या अनुषंगाने नक्षलविरोधी कारवाईत/नक्षलवादी हल्ल्यात मृत वा जखमी झालेले पोलीस कर्मचारी/अधिकारी व गृहरक्षक दलाचे कर्मचारी यांच्या अपत्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणा-या सर्व अभ्यासक्रमाचे पदव्युत्तर पदवी स्तरापर्यंत मोफत शिक्षण देण्यात येईल.

२. यामध्ये पारंपारिक शिक्षणासह व्यावसायिक/अभियांत्रिकी/वैद्यकीय आणि व्यवस्थापकीय शिक्षणाचा समावेश राहील.

३. सदरहू योजना शासनाच्या शिक्षण संस्था, अशासकीय अनुदानित शिक्षण संस्था, स्वायत्त शिक्षण संस्था, कायम विना अनुदानित शिक्षण संस्था, अभिमत विद्यापीठे, इत्यादी राज्यातील सर्व शिक्षण संस्थांमध्ये शिकविल्या जाणा-या अभ्यासक्रमांना लागू राहील.

४. सदर विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी लागणा-या शिक्षण शुल्काची तसेच इतर शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती शासनामार्फत करण्यात येईल.

५. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून लागू राहील. चालू शैक्षणिक (सन २०१०-११) वर्षात ज्यांचे शुल्क भरावयाचे राहिले असेल ते शुल्क त्यांना भरण्याची आवश्यकता राहणार नाही. त्याची अदायगी शासनाकडून करण्यात येईल.

६. ज्या संस्थांना शासनाकडून अनुदान दिले जात नाही, अशा संस्थांना शिक्षण शुल्काची तसेच इतर सर्व शुल्काची अदायगी शासनाकडून करण्यात येईल. अनुदानित संस्थांनी सर्व शुल्काकरिता संबंधित सहसंचालकांकडे प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर, वेतन अनुदानाच्या देयकासमवेत मागणी नोंदवावी. विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण यांनी याबाबत अदायगीची कार्यवाही करावी. सर्व शिक्षण संस्थांना निर्देशित करण्यात येते की, मृत अथवा जखमींच्या अपत्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारु नये. वसतीगृहात वास्तव्यास असलेल्यांच्या प्रत्यक्ष खर्चाइतकी भरपाई सर्व संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडून करण्यात येईल.

७. या योजनेकरिता विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व संचालक, तंत्र शिक्षण यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. या योजनेपोटी येणारा खर्च लेखाशीर्ष २२०३, तंत्रशिक्षण, १०७ शिष्यवृत्या पंचवार्षिक योजनोंतर्गत योजना (००)(०६)(२२०३०७४८) मध्ये खर्ची दाखविण्यात यावा.

९. हा शासन निर्णय गृह विभागाच्या दिनांक ६.२.२००९ च्या शासन निर्णयात विहित केल्याप्रमाणे सविस्तर स्वरुपात निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय सहसंचालक (तंत्रशिक्षण)
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई
पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई ३२.
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
अप्पर आयुक्त, आदिवासी विकास (सर्व)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व संबंधित मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक
कुलगुरु, सर्व विद्यापीठे.
निवडनस्ती/तांशि-४.

C:\Documents and Settings\Administrator\My Documents\Lole\TE४\GR\Naxalites.doc